# BY THE COLLECTOR OF MUMBAI CITY DISTRICT

## Notification

**Right To Fair Compensation And Transparency in Land Acquisition, Rehabilitation And Resettlement Act, 2013**

No.C/ACQ/Mum.city/CR.3/LAQ/SR/2019 C.S.No.665 Bhuleshwar Division- Whereas the Government Maharashtra vide Government Notification, Revenue and Forests Department, No.MIS-11/2014/C.R77/A-2, dated the 19th January 2015 (hereinafter referred to as "the said notification") issued in exercise of the powers conferred by the proviso to clause (e) of section 3 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013), had notified that in relation to acquisition of land in respect of a public purpose, as defined in clause (za) of section 3 of the said Act, in a District for an area not exceeding 500 hectors, the collector of such District shall be deemed to be the appropriate Government, for the purposes of the said Act;

2. Whereas, It appears to the Collector of Mumbai City being appropriate Government in view of the said notification, that land more particularly described in schedule appended hereto (hereinafter referred to as "the said land"), is needed or likely to be needed for the public purpose of Mumbai Metro Line – 3 (hereinafter referred to as " the said public purpose"), and therefore, it is hereby notified under provisions of sub-section (1) of section 11 of the said Act, that said land is likely to be needed for the said public purpose;

3. Whereas, the land under this project is being acquired for infrastructural facilities, this project is exempted from the application of provisions of chapters 2 and 3 ( from section 4 to 10 ) of Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, (Hereinafter referred as "Said Acquisition Act") by section 10 (A) of state government notification dated 26th April, 2018;

4.Whereas, Ministry of Urban Development, Government of India vide its Notification No. S.O.2813 (E) dt. 18th Septembar 2013 published in Extraordinary Gazette of India on 19th Septembar 2013 has notified the alignment of Mumbai Metro Line-3 ;

5. Whereas, Mumbai Metro Rail corridor including Mumbai Metro Line-3 namely Colaba-Bandra-Speez been declared as "Urgent Public Project" & "Important Urban Transport Project" to be executed by a Joint venture of Government of India and Government of Maharashtra vide Urban Development Department, Mantralaya GR No. MRD-3311/GR.149 /UD-7 dated 3 March 2014 and Government of India has directed State Government to expedite the process of acquisition of private lands;

6. Whereas, the State Government has sanctioned to rehabilitate & resettle Project affected persons due to Metro Line- 3 as per the Maharashtra Urban Transportation Project-Rehabilitation & Resettlement (MUTP-R&R) Policy vide above mentioned government resolution. However Mumbai Metro Rail Corporation Limited is going to rehabilitate and resettle the affected person as per "In-situ" rehab policy which is prepared in cousultation with project affected persons;

7. And whereas, the Collector, Mumbai City, is satisfied that the said land is needed for the said public purpose;

8. Therefore, it is declared as per sub-section (4) of section 11 of the said Act, that no person shall make any transaction of said land or part thereof or create any encumbrances on said land from the date of publication of this Notification till such time as the proceeding under chapter IV of the said Act are completed: Provided that, the Collector may, on the application made by the owner of the said land or part thereof exempt in special circumstances to be recorded in wirting, such owner from the operation of the above provision: further that, any loss or injury suffered by any person due to his willful violation of this provision shall not be made up by the collector. It is further declared that according to sub-section (5) of section 11 of the said Act, the Collector is going to undertake and complete the exercise of updating of land records as prescribed by sub-rule (3) of rule 10 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra) Rules, 2014 (hereinafter referred to as the said Rules); the Collector being the appropriate Government is pleased to designate Deputy Collector (Land Acquisition) Mumbai City to perform the functions of Collector under clause (g) of section 3 of said Act, invoking urgency clause U/s 40 of the said Act;

**Schedule**
**Description of Land**
**District Mumbai City**

| Sr. No. | Division | C.S.No. | Area in Sq. Mtrs. |
|---|---|---|---|
| 1 | Bhuleshwar | 665 | 102.84 |

Public Purpose: Acquisition for the purpose of Mumbai Metro Line-3

Please: Mumbai City
Date: 08/02/2019

Shivaji Jondhale,
Collector Mumbai City

:\MMRCL Land Acq\C.S.No.665\C.S.No. 665 Bhuleshwar Sec.11 Notification - Copy.docx

## जिल्हाधिकारी, मुंबई शहर

## अधिसूचना

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३**

क्रमांक जि/भूसं/मु.श/प्र.क्र.३/एलएक्यू/एसआर/२०१९ भूकर क्र. ६६५ भुलेश्वर विभाग- भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतूकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक-१९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोनाजसाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

२. ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) मुंबई मेट्रो लाईन-३ या सार्वजनिक प्रयोनाजसाठी (यात यापुढे जिचा निर्देश "सार्वजनिक प्रेयाजनासाठी" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

३. ज्या अर्थी, सदर भूसंपादन प्रस्तावातील मिळकत ही उक्त सार्वजनिक प्रयोजनार्थ पायाभूत सुविधासाठी संपादन करण्यात येत असल्याने सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २६ एप्रिल २०१८ मधील कलम १० (क) अन्वये भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (यापुढे ज्याचा निर्देश "भूसंपादन कायदा" असा करण्यात आला आहे.) मधील प्रकरण क्रमांक २ व ३ मधील (कलम ४ ते १० मधील) तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे;

४. ज्या अर्थी भारत सरकारच्या शहर विकास मंत्रालयाने क्र. का.आ.२८१३ (अ) दिनांक १८ संप्टेबर २०१३, प्रसिध्दी दिनांक १९ संप्टेबर २०१३ च्या भारत सरकारच्या असाधारण राजपत्राव्दारे मुंबई मेट्रो लाईन ३ चे संरेखन (alignment) अधिसूचित केले आहे.

५. ज्या अर्थी, केंद्र शासन व राज्य शासनाचा संयुक्त उपक्रम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे व्दारे कार्यरत कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो रेल्वे मार्गिका हा प्रकल्प नगर विकास विभाग, मंत्रालय, यांचे कडील शासन निर्णय क्र.एमआरडी-३३११/प्र.क्र.१४९/नवि-७ दिनांक ३ मार्च २०१४ अन्वये "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यात आला आहे, व केंद्र शासनाने राज्य शासनास खाजगी जमीनीची भूसंपादनाची प्रकिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत;

६. ज्या अर्थी, उपरोक्त शासन निर्णयानुसार सदर प्रकल्पाअंतर्गतच्या प्रकल्प बाधीतांचे पुनर्वसन व पुनर्वसाहत "मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरण (MUTP-R&R Policy)" नुसार करण्याकरीता

मान्यता देण्यात आली आहे. तथापी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड, प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार तयार केलेल्या "त्याच ठिकाणी" (In situ) पुनर्वसन धोरणानुसार पुनर्वर्सन करणार आहे.

७. आणि ज्या अर्थी, उक्त जमिनी, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याबाबतची जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांची खात्री झाली आहे.

८. त्या अर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतू उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल; परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हीनीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही. तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) च्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, तातडीचे कलम ४० लागू करुन उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर जिल्हा यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची**

**जमिनीचे वर्णन**

**जिल्हा मुंबई शहर**

| अ.क्र. | विभाग | भूकर क्रमांक | संपादनाखालील जमिनीचे क्षेत्र चौ.मी |
|---|---|---|---|
| १ | भूलेश्वर | ६६५ | १०२.८४ |

**सार्वजनिक प्रयोजन:-** मुंबई मेट्रो लाईन-३ करीता भूसंपादन

ठिकाण:- मुंबई शहर

दिनांक :- 03/02/2018

शिवाजी जोंधळे,
जिल्हाधिकारी, मुंबई शहर